रे.के.नं. २२/२१

नि.क्र. ३६/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | मोहम्मद इरफान अब्दुल अजीज ठाकूर |
| वय | – | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | – | व्यापार, |
| राहणार | – | मस्जिद मोहल्ला, उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. कदम यांच्यामार्फत...</u>**

१. आरोपी मुश्ताक माझा मोठा भाउ असून आरोपी क्र. १ व २ त्याची मुले व आरोपी क्र. ४ त्याची सून आहे. ते माझ्या शेजारी राहतात. दिनांक १७.०३.२०२० रोजी मी, माझी पत्नी व पुतण्या आराफत सकाळी १०.३० च्या सुमारास घरामध्ये बसलो होतो. त्यावेळी माझा मुलगा अब्दुल अजीज घरातून बाहेर जाण्यासाठी निघाला. आरोपी व आमच्या घरातून बाहेर जाण्याकरीता एक मुख्य दरवाजा आहे. त्या दरवाजास एक स्प्रिंग आहे. ती स्प्रिंग बसली नाही. त्यामुळे दरवाजा लागला नाही. त्या दरवाजातून माझा मुलगा बाहेर जात असताना आरोपी क्र. १ ते ३ सोबत त्याचा वाद झाला. त्याचा आवाज आल्याने माझी पत्नी नाहिदा बाहेर आली. त्यानंतर मी बाहेर आलो. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ३ माझ्या मुलाला सलियाने मारत होते. मी त्यांना सोडवण्यासाठी गेलो असता आरोपी मुश्ताकने मला हाताने मारहाण केली. माझी पत्नी देखील सोडवण्यासाठी आली. त्यावेळी आरोपी रिहानाने तिला हाताने मारहाण केली.

२. आरोपी क्र. १ व २ यांनी माझ्या मुलास सलियाने डोक्यात मारल्यामुळे त्याच्या डोक्यात जखम झाली. त्यानंतर आराफतने येउन आमची भांडणे सोडवली. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. तेथे आम्ही तक्रार देउन मुलगा अजिज यास उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. आता मला मुद्देमाल आर्टीकल अ सलिया दाखवण्यात आला. त्यानेच आरोपींनी माझ्या मुलास मारहाण केली. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गांगण यांच्यामार्फत...</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब नोंदवताना पोलीसांनी मला आरोपींनी गुन्हयात वापरलेले हत्यार दाखवले होते. हे म्हणणे खरे आहे की, सलिया व पाईप या दोन वेगळ्या वस्तू आहेत. पोलीसांना जबाब देताना मी आरोपी क्र. १ ते ३ यांनी सलियाने माझ्या मुलाला मारल्याचे सांगितले होते. मला मराठी वाचता येत नसल्याने तो मजकूर पोलीसांनी माझ्या जबाबात का लिहिला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझा व आरोपी मुश्ताकचा घराच्या मालकी हक्कावरून वाद आहे. हे मला माहिती नाही की, माझ्या इतर भावांचा देखील मुश्ताकसोबत घराच्या मालकी हक्कावरून वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरामागे एक मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेचा ताबा आरोपी क्र. १ व २ यांनी जबरदस्तीने घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेवर ते मला जाउ देत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या जागेवर जाण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र. १ व २ यांनी मला शिवीगाळ व मारण्याची धमकी दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझी पत्नी व मुलगा यांच्यावर गुन्हा दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या गुन्हयाची फिर्याद आरोपी क्र. ३ ने दिलेली आहे.

५. हे मला माहिती नाही की, फेब्रुवारी २०१९ ते ऑक्टोबर २०१९ या कालावधीमध्ये आरोपींनी माझ्याविरूद्ध तसेच माझी पत्नी व मुलगा यांच्याविरूद्ध उरण पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केलेल्या आहेत. हे मला माहिती नाही की, दिनांक १३.०१.२०२१ रोजी मला उरण पोलीस ठाण्यामध्ये एक माफीनामा लिहून द्यावा लागला होता. हे मला माहिती नाही की, दिनांक २९.१०.२०२१ रोजी आरोपी क्र. ३ ने माझ्या मुलाविरूद्ध गुन्हा दाखल केला होता.

६. हे मला माहिती नाही की, ज्या ज्या वेळी माझ्या मुलाविरूद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल होत होता त्यावेळी मला व माझ्या पत्नीला देखील पोलीस ठाण्यात बोलावत असत. घटनेच्या दिवशी दुपारी १२.३० वाजता मी घरी होतो. मी मोहम्मद अजीज इमरान ठाकूर या व्यक्तीस ओळखत नाही. त्या दिवशी १२.३० वाजल्यानंतर मी किती वेळ घरात होतो हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझी पत्नी देखील माझ्यासोबत घरी होती. घटनेच्या दिवशी माझी पत्नी पूर्ण वेळ माझ्यासोबत होती काय हे मला आठवत नाही. घटनेच्या दिवशी मी साधारण ११.०० ते ११.३० च्या दरम्यान पोलीस ठाण्यात गेलो. त्यावेळी माझी पत्नी माझ्यासोबत होती. त्यादिवशी पोलीसांनी माझा जबाब नोंदवला काय हे मला आठवत नाही.

७. माझ्या घराच्या व्ह–यांड्याची लांबी रूंदी मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्ह–यांड्याच्या उजवीकडे आरोपींच्या घराचा दरवाजा व डावीकडे माझ्या घराचा दरवाजा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपीच्या घराच्या दरवाज्यावर सी.सी. टीव्ही कॅमेरा लावलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या कॅमेरामध्ये व्हरांडा दिसतो. हे मला माहिती नाही की, घटनेच्या दिवशी ११.०० ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान मी व्ह–यांड्यामध्ये फिरत होतो. हे म्हणणे

खरे नाही की, त्यादिवशी ११.१४ मिनीटांनी मी बॅटने आरोपी क्र. १ यास मारत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझ्या हातात बॅट होती. हे मला माहिती नाही की, माझ्या मुलाच्या अंगावर पाच जखमा होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाला झालेल्या जखमा माझ्यासमक्ष झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याबाबत पोलीसांना काही सांगितले नाही. मी उपचार घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल आर्टीकल अ यास सलिया म्हणत नाहीत.

८. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०३.२०२० रोजी आरोपींनी मला, माझ्या मुलास व पत्नीस मारहाण केलयाचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझा मुलगा व पत्नी रूग्णालयात उपचारासाठी गेल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपीचे पूर्वीपासून वाद असल्याने मी आरोपींविरूद्ध खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ०४.०७.०२०२३ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण